# तहसिलदार वाशिम यांचे कार्यालय, वाशिम

रा.मा.क्र.एन.ए.पी.-३४/गोंदेश्वर/०८/२०२२-२३

**आदेश**

**( पारित दिनांक :-०९/०९/२०२२)**

महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम १९६६ चे कलम ४४(२) नुसार तहसिलदार वाशिम यांचे कार्यालयातील रा.मा.क्र. एन.ए.पी.-३४/गोंदेश्वर/१०/२०१७-२०१८ आदेश पारित दिनांक १८/१०/२०१७ अन्वये मौजे गोंदेश्वर येथील सर्व्हे नं. १०/१ मधील भुखंड क्रमांक ८ चे क्षेत्र ४५९.६४ चौ.मी., भुखंड क्रमांक ९ चे क्षेत्र ४५२.७२ चौ.मी. व भुखंड क्रमांक १० चे क्षेत्र ४५१.४९ चौ.मी. अकृषक झालेल्या भुखंड क्रमांक चे एकत्रिकरण मुख्याधिकारी नगर परिषद वाशिम यांनी दिनांक ०५/०९/२०२२ रोजीच्या आदेशान्वये एकत्रिकरण करुन दिलेल्या भूखंडाची अकृषक आकारणी करुन मिळणे बाबत अर्ज अर्जदार श्री. उदय रामराव सरनाईक व इतर तर्फे बदलाणी बिल्डर्स ॲन्ड डेव्हलपर्स प्रा. लि. वाशिम ता. जि. वाशिम यांनी या कार्यालयात सादर केला. अर्जा सोबत गटाचा ७/१२, भुखंड एकत्रिकरण बाबतच्या निळप्रती सादर केल्यात. सदर कागदपत्रे प्रकरणात जोडली आहे.

मा. जिल्हाधिकारी वाशिम यांनी त्यांचे कार्यालयीन आदेश क्र./कक्ष-४/अका(महसुल)/कावि-५९७ व ५९८ दिनांक १६/०९/२०१९ नुसार महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ चे कलम ४२ अ,ब,क व ड नुसार अकृषक आकारणी करण्याचे अधिकार या कार्यालयास प्रदान केलेले आहेत.

**विवरणपत्र**

| अ.क्र. | भुखंड क्रमांक | पुर्वीचे क्षेत्र | एकत्रिकरण करावयाचे भुखंड क्रमांक | एकत्रिकरण नंतरचे सुधारीत क्षेत्र | आकारणी दर | सुधारित अकृषक आकारणी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ८ | ४५९.६४ | ८,९,१०/१ | १३६३.८५ | ०.८८ | १२००.१८ |
| २ | ९ | ४५२.७२ | | | | |
| ३ | १० | ४५१.४९ | | | | |
| | एकुण | १३६३.८५ | | १३६३.८५ | ०.८८ | १२००.१८ |

बदलाणी बिल्डर्स ॲन्ड डेव्हलपर्स प्रा. लि. वाशिम ता. जि. वाशिम यांनी सादर केलेले कागदपत्राचे अवलोकन करुन मी, विजय साळवे तहसिलदार वाशिम महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ चे कलम ४४ (२) नुसार मौजे गोंदेश्वर येथील सर्व्हे नं. १०/१ मधील भुखंड क्रमांक ८ चे क्षेत्र ४५९.६४ चौ.मी., भुखंड क्रमांक ९ चे क्षेत्र ४५२.७२ चौ.मी. व भुखंड क्रमांक १० चे क्षेत्र ४५१.४९ चौ.मी. प्लॉट श्री. उदय रामराव सरनाईक व इतर तर्फे बदलाणी बिल्डर्स ॲन्ड डेव्हलपर्स प्रा. लि. वाशिम ता. जि. वाशिम यांचे नावे जागा नगर परिषद वाशिम यांचे दिनांक ०५/०९/२०२२ रोजीचे

आदेशान्वये एकत्रिकरण केलेल्या भुखंडाची अकृषक आकारणी खालील अटी व शर्तीचे अधिन राहुन परवानगी देण्यात येत आहे.

## अटी व शर्ती:-

१. प्रकरणात मुख्याधिकारी, नगर परीषद वाशिम यांनी त्यांचे आदेश जा.क्र. CBWWM/SA/२०२२/APL/०००२४ दिनांक ०५/०९/२०२२ नुसार मधील सर्व अटी व शर्तीचे पालन करणे अर्जदार यांना बंधनकारक आहे.
२. अर्जदारास सदर आकारणी उक्त अधिनियमाच्या अंतर्गत व त्या अनुषंगाने प्रचलीत नियमानुसार करून देण्यात आलेली आहे.
३. या जमीनीवरील निवासी प्रयोजनाकरीता क्षेत्र १३६३.८५ चौ.मी. जमीनीवर वार्षीक कर आकारणी प्रति चौ.मी. ला ०.८८ रू/पैसे प्रमाणे १२००/- रूपये (अक्षरी एक हजार दोनशे रुपये फक्त फक्त) एवढा वार्षीक अकृषक कर आकारण्यात येत आहे. सदर आकारणी दरवर्षी भरणे अर्जदारास बंधनकारक राहील.
४. मंजुर अभिन्यासातील प्रत्येक भूखंडावर किती अकृषक कर आकारण्यात आले आहे. ते विवरणपत्रा मध्ये नमुद्र केले आहे.
५. अर्जदार यांना जुन्या आदेशातील अटी व शर्तीचे पालन करणे बंधनकारक राहील.

तहसिलदार, वाशिम

प्रतिलीपी

१. मुख्याधिकारी नगर परिषद वाशिम ता.जि. वाशिम यांना माहिती करीता.
२. उपअधिक्षक भुमी अभिलेख विभाग वाशिम यांना माहिती करीता.
३. जमाबंदी लिपीक तहसिल कार्यालय वाशिम यांना माहीती तथा उचित कार्यवाहीस रवाना.
४. तलाठी, मौजे गोंदेश्वर ता.जि.वाशिम यांना माहिती व पुढील कार्यवाही करीता अग्रेषित.
५. अर्जदार श्री. उदय रामराव सरनाईक व इतर तर्फे बदलाणी बिल्डर्स ॲन्ड डेव्हलपर्स प्रा. लि. वाशिम ता. जि. वाशिम यांना माहिती करीता.

तहसिलदार, वाशिम

तहसिलदार यांचे कार्यालय वाशिम